# टीबीमुक्तीसाठी नांदेड जिल्ह्यात पाच गावांत पायलट प्रोजेक्ट

नांदेड, ता. १४ : केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नांदेड जिल्ह्यात 'टीबी मुक्त भारत अभियान' अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी पाच उच्च-जोखीम गावांमध्ये पायलट प्रोजेक्ट सुरू करण्यात येणार आहे. प्रत्येक गावात 'माय भारत'चे पाच स्वयंसेवक आणि पाच एनसीसी कॅडेट्स अशी दहा सदस्यांची टीम तयार करून त्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या प्रकल्पाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (ता. १२) जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिराणी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मीरदुडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. चव्हाण, जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी रेणुका दराडे यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

प्रत्येक गावातील दहा सदस्यांच्या टीमचे नेतृत्व प्रथम वर्ग, वर्ग-१ नोडल अधिकाऱ्याकडे राहणार आहे. स्वयंसेवकांना क्षयरोगाची लक्षणे ओळखणे, प्रतिबंधात्मक उपाय, जनजागृती तसेच रुग्णांना सहकार्य करण्याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये दोन दिवसांचे 'नो टीबी सेशन्स' आणि पाच दिवसांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण कार्यक्रम असेल. प्रशिक्षणानंतर स्वयंसेवक घरोघरी जाऊन क्षयरोगाबाबत जनजागृती करतील. स्वच्छता व नशामुक्तीचा संदेश देतानाच आयुष्मान आरोग्य शिबिरांमध्येही सहभाग घेतील. तसेच 'निक्षय मित्र' योजनेअंतर्गत टीबी रुग्णांना पोषण आहार किट वाटपासाठी मदत करतील.या उपक्रमामुळे गावपातळीवर क्षयरोगाची लक्षणे असलेल्या व्यक्तींची वेळेत ओळख, तपासणी आणि उपचारासाठी मदत होणार आहे. पायलट प्रोजेक्ट गांभीर्याने राबवून आरोग्य विभाग, शिक्षण संस्था, एनसीसी आणि युवा स्वयंसेवकांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# गांडुळाला सोडले नैसर्गिक अधिवासात

नांदेड : विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरात बुधवारी गांडूळ आढळून आले होते. ही माहिती सर्पमित्र कुणाल महागडे यांना देण्यात आल्यानंतर त्यांनी गांडुळाला नैसर्गिक अधिवासात सोडले. गांडूळ 'रेड सँड बोआ' नावाने ओळखला जाणारा बिनविषारी साप आहे. त्याची शेपटी बोथट असून डोक्यासारखी दिसत असल्याने त्याला 'दोन तोंडाचा साप' असेही म्हटले जाते. प्रत्यक्षात त्याला दोन तोंडे नसतात. गांडुळाबाबत औषधी किंवा अलौकिक गुणधर्म असल्याच्या अनेक अंधश्रद्धा प्रचलित आहेत. मात्र, त्याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. अशा गैरसमजांमुळे या सापाची तस्करी होण्याची शक्यता असते. साप आढळल्यास नागरिकांनी स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. प्रशिक्षित सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**नगर परिषद कळमनुरी, जि. हिंगोली**

ई- मेल-coklm१२३४@gmail.com

**ई-निविदा सूचना**

नगर परिषद कळमनुरी मार्फत १५ वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रभाग क्र.०१ ते १० मधील कचरा उचलणे, संकलित करणे, विलगीकरण करणे, व वाहतुक करणे ईत्यादी कामाकरीता पंजीकृत संस्था निविदाधाराकाकडून ई निविदा पध्दतीने दि: ३१/०८/२०२६ वेळ सायं ५.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात येत आहेत. याबाबत सविस्तर माहिती दि: १५/०८/२०२६ रोजी ते दि: ३१/०८/२०२६ पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर माहिती पाहता व डाऊनलोड करता येईल.

स्वा/-
(रविराज दरक)
मुख्याधिकारी
नगरपरिषद कळमनुरी


# कृषी विद्यापीठ-'एसआयआयएलसी'मध्ये करार

SIILC Transforming Human Capital



राहुरी : महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि 'सकाळ' व अॅग्रोवन संलग्न कौशल्य प्रशिक्षण संस्था एसआयआयएलसी यांच्यात कौशल्य विकास, शिक्षण, संशोधन आणि उद्योगाभिमुख उपक्रमांना चालना देण्यासाठी दीर्घकालीन सहकार्याचा सामंजस्य करार कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

राहुरी, ता. १४ : महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि 'सकाळ' व अॅग्रोवन संलग्न कौशल्य प्रशिक्षण संस्था 'एसआयआयएलसी' यांच्यात कौशल्य विकास, शिक्षण, संशोधन आणि उद्योगाभिमुख उपक्रमांना चालना देण्यासाठी दीर्घकालीन सहकार्याचा सामंजस्य करार कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे आणि 'एसआयआयएलसी'चे उपसरव्यवस्थापक अमोल बिरारी यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

या वेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, कृषी तंत्रज्ञानाचे सहअधिष्ठाता डॉ. राजेंद्र हिले, कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, कृषी अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सुनील कदम आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. खर्चे म्हणाले, "विद्यापीठ १२५ हून अधिक पिकांवर काम करते. आतापर्यंत विद्यापीठाने विविध पिकांचे ३२० वाण, ५५ यंत्रे व दोन हजारांहून अधिक तंत्रज्ञान शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारित केल्या आहेत. सध्या सर्वांना शेतीच्या प्रत्येक कामात कौशल्याची आवश्यकता आहे. या करारामुळे शेतकरी, महिला शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्य घटकाला कौशल्याधारित प्रशिक्षण मिळणार असून, याद्वारे उद्योजकतेची निर्मिती, तसेच आधुनिक पद्धतीने शेती करण्यास मदत होईल."विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे प्रास्ताविकात म्हणाले, "या कराराच्या माध्यमातून विविध प्रकारच्या कौशल्यांवर आधारित उपक्रम संयुक्तरीत्या राबविण्यावर भर असेल. त्याचा फायदा कृषी व संबंधित क्षेत्रातील मनुष्यबळासह विद्यार्थी, युवक, शेतकरी तसेच उद्योजकांना होईल."

बिरारी म्हणाले, "या करारांतर्गत उद्योगांच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ तयार करणारे प्रमाणपत्र, डिप्लोमा, अद्ययावत कौशल्य विकास अभ्यासक्रम संयुक्तपणे राबविण्यात येतील. तसेच, सेंटर ऑफ एक्सलन्स, इनोव्हेशन हब, उद्योजकता विकास केंद्र आणि इनक्युबेशन उपक्रमांच्या माध्यमातून नवकल्पना व स्टार्टअपना प्रोत्साहन दिले जाईल." डॉ. मृणाल आजोतीकर यांनी सूत्रसंचालन केले.

# 'शुद्धीकरण' विधीचा निषेध

नांदेड, ता. १४ : काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्द्वानी (उत्तराखंड) येथील सभेनंतर हिंदुत्ववादी संघटनांकडून गंगाजलाने शुद्धीकरणाचा विधी करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी (ता. १४) नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने निदर्शने करण्यात आली. खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुले स्मारकासमोर आंदोलन करण्यात आले.

या घटनेमुळे देशाच्या अखंडतेला बाधा पोचत असल्याची प्रतिक्रिया खासदार रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केली. देशातील विविध समाजघटकांमध्ये एकोपा कायम राहणे आवश्यक असताना अशा प्रकारच्या कृतींमुळे सामाजिक वातावरण दूषित होत असल्याचे त्यांनी सांगितले. उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे आणि महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने आंदोलन झाले. यावेळी हिंदुत्ववादी संघटना आणि भाजप सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनात माजी आमदार हणमंतराव बेटमोगरेकर, सुरेश गायकवाड, सुरेंद्र घोडसकर, श्रावण रँपनवाड, डॉ. दिनेश निखाते, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, पाशा भाई, मौसिन खान, बाबूभाई खोकेवाले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.


**भारतीय डाक विभाग**

**डाकघर अधीक्षक, लातूर विभाग यांचे कार्यालय, लातूर -४१३५१२**

**निविदा सूचना**

१. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने अधीक्षक डाकघर, लातूर विभाग, लातूर ४१३५१२ यांच्यामार्फत निटूर उप डाकघर, निटूर - ४१३५३० या कार्यालयासाठी भाडेतत्वावर (५/१० वर्ष किंवा आवश्यकतेनुसार अधिक कालावधीसाठी) इमारत उपलब्ध करून देण्यासाठी इच्छुक घरमालक, संस्था व फर्म यांचेकडून बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

**२. आवश्यकता :** अ) शक्यतो तळमजल्यावरील आर. सी. सी. ५०० चौरस फूट (चटई क्षेत्र) पर्यंतच्या क्षेत्रफळाची इमारत. ब) वीज, पाणी, स्वतंत्र शौचालय ई. सुविधा उपलब्ध असाव्या. क) काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी आणि कार्यालयामध्ये येणाऱ्या जनतेसाठी पार्किंगची सुविधा उपलब्ध असावी. ड) इमारत ही निटूर गावाच्या हद्दीमध्ये असावी. इ) महानगरपालिका/नगरपरिषद/ ग्रामपंचायत कर घरमालकाने भरावा लागेल.

**३. निविदेसोबत खालील कागदपत्रे सादर करावीत.**
अ) रफ स्केच नकाशा ब) संबंधित प्राधिकरणाने मंजूर केलेला इमारत आराखडा. क) बांधकामाचा प्रकार आणि वर्ष. ड) मालमत्तेच्या मालकीची / नोंदणीची प्रत.

४. निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख दि. २५.०८.२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत आहे. "निटूर उप-डाकघर, निटूर - ४१३५३० साठी इमारतीची निविदा" असे स्पष्टपणे नमूद करून सीलबंद लिफाफ्यातील निविदा अधीक्षक डाकघर, लातूर विभाग, लातूर - ४१३५१२ या पत्त्यावर पाठवाव्यात. निविदा त्याच दिवशी सायंकाळी १७.०० वाजता उपस्थित निविदाकारांच्या समक्ष उघडल्या जातील.

५. निविदादारांनी अनामत (E.M.D) म्हणून रक्कम रु. १००/- (रु. शंभर) जमा करावी. लातूर विभागातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये सदर अनामत रक्कम जमा करून मूळ पावती निविदेसोबत जोडावी. त्याशिवाय निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदा स्वीकारली गेली तर, घरमालकाला पाच / दहा वर्षांसाठी भाडेपट्टा करार (डाक विभागाच्या स्वरूपानुसार) करावा लागेल आणि तो स्वखर्चाने नोंदणीकृत करावा लागेल. आवश्यक असल्यास इमारतीमध्ये इतर सुधारणा / बदल करावा लागेल. ६. अधीक्षक डाकघर, लातूर विभाग, लातूर-४१३५१२ हे कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

अधीक्षक डाकघर,
लातूर विभाग, लातूर - ४१३५१२


# जनगणनेसाठी ४० प्रश्नांची सूची

» पान १ वरून... मधील आहे का, हे विचारण्यात येईल. मात्र, या प्रश्नात इतर मागासवर्गीय (ओबीसी) किंवा खुल्या अथवा सर्वसाधारण प्रवर्गाचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

### सर्व प्रश्नांचा समावेश

- **रजिस्ट्रार जनरल मृत्युंजयकुमार नारायण यांच्या आदेशाने प्रश्नावलीची यादी जारी करण्यात आली आहे. केंद्राच्या प्रश्नावलीमध्ये वैयक्तिक माहितीपासून रोजगारापर्यंत सर्व प्रकारच्या प्रश्नांचा समावेश असून त्याआधारे लोकसंख्या तसेच सामाजिक, आर्थिक स्थितीची आणि जातींची माहिती घेण्यात येईल. व्यक्तीच्या जन्मापासून शिक्षण, वैवाहिक स्थिती, कुटुंब, भाषा, जात, धर्म, रोजगार, व्यवसाय आणि स्थलांतरापर्यंत विविध बाबींची माहिती घेण्यात येणार आहे.**

# पुढील वर्षी 'एल निनो' प्रभावहीन

» पान १ वरून

महासागराच्या पृष्ठभागाखालील उबदार प्रवाहांचे तापमान सरासरीपेक्षा १० अंशांनी जास्त नोंदले जात आहे.

येत्या ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत विक्रमी तीव्रतेचा (सरासरीपेक्षा २.५ अंशांपेक्षा जास्त तापमान) 'एल निनो' विकसित होण्याची शक्यता ६९ टक्के आहे. 'एल निनो' नोव्हेंबरमध्ये सर्वोच्च पातळीवर पोचल्यानंतर जानेवारीपासून तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये विषुववृत्तीय प्रशांत महासागराचे तापमान सरासरीपेक्षा एक अंशांच्या दरम्यान येण्याची शक्यता असून, त्यावेळी क्षीण 'एल निनो' राहण्याची शक्यता सर्वाधिक आहे. प्रशांत महासागराच्या तापमानाच्या अंदाजाचा दर लक्षात घेता,

पुढील वर्षीच्या जूनपर्यंत तेथील तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंशांच्या दरम्यान येण्याची शक्यता जास्त आहे. अंदाज खरा ठरल्यास, पुढील मॉन्सूनच्या आगमनाच्या वेळी प्रशांत महासागरातील सध्याची 'एल निनो'ची स्थिती जाऊन तिथे न्यूट्रल स्थिती तयार होऊ शकते. तेथील न्यूट्रल स्थिती मॉन्सूनवर प्रतिकूल परिणाम न करता तटस्थ राहू शकते, असे ऐतिहासिक आकडेवारी सांगते.

### ११ जिल्ह्यांमध्ये अपुरा पाऊस

- **भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (आयएमडी) आकडेवारीनुसार, देशभरात एक जून ते १४ ऑगस्ट या कालावधीत सरासरीपेक्षा १२.६ टक्के कमी, तर राज्यात तीन टक्के कमी पाऊस झाला आहे. ऑगस्टमध्ये कोकण, घाटमाथा वगळता राज्यात इतरत्र पावसाचा जोर ओसरल्यामुळे अपुऱ्या पावसाच्या जिल्ह्यांची संख्या पुन्हा वाढली आहे. जुलैअखेरीस राज्यात फक्त पाच जिल्ह्यांमध्ये अपुरा पाऊस (सरासरीपेक्षा २० ते ५९ टक्के कमी) नोंदला गेला होता. १४ ऑगस्टपर्यंत सिंधुदुर्ग, नंदुरबार, सोलापूर, जालना, बीड, हिंगोली, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली हे ११ जिल्हे अपुऱ्या पावसाच्या श्रेणीमध्ये आले.**


**महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई- ४०० ०३०. महामंडळामार्फत खालील कामांकरीता बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून "नमुना सी म्हणजे ठोक पध्दतीची जीएसटी वगळून (Lumpsum)"ई- निविदा मागविणेत येत आहेत.**

**ई- निविदा सुचना क्र. १८, वर्ष २०२६-२०२७**

**"पोलीस अधीक्षक लातूर यांचेकरिता कासारसिरसी व किनगाव येथे पोलीस स्टेशन इमारतींचे सर्व पायाभूत सुविधांसह बांधकाम करणे."**

- ऑनलाईन को–या ई– निविदा प्रपत्राची रक्कम : रुपये ३,५४०/– (१८ टक्के जीएसटीसह (ना परतावा योग्य))
- ऑनलाईन बयाणा रक्कम : ७,८९,७००/- रुपये.
- (कामाची अंदाजित रक्कम जीएसटी वगळून – रु.७८९.७० लक्ष)

को-या निविदा प्रपत्राची रक्कम व बयाणा रक्कम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाचे ऑनलाईन " पेमेंट गेटवे "व्दारेच स्वीकृत केली जाईल.

को-या ई – निविदा व नकाशे यांची नक्कल (Downloading) करणे / विक्रीकरण https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर दिनांक १७/०८/२०२६ रोजी १७.०० वा. पासून उपलब्ध होतील.

संपर्कासाठी दूरध्वनी क्र. (help desk no.) ०१२०-४००१००२/००५, ०१२०- ४४९३३९५

**दिपाली स्व. भाईक**
**मुख्य अभियंता**

**महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई- ४०० ०३०. महामंडळामार्फत खालील कामांकरीता बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून "नमुना सी म्हणजे ठोक पध्दतीची जीएसटी वगळून (Lumpsum)"ई- निविदा मागविणेत येत आहेत.**

**ई- निविदा सुचना क्र. १७, वर्ष २०२६-२०२७**

**"पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचेकरिता सिटी चौक येथे पोलीस स्टेशन तथा सहायक पोलीस आयुक्त कार्यालय व वाळुज येथे पोलीस स्टेशन इमारतींचे सर्व पायाभूत सुविधांसह बांधकाम करणे."**

- ऑनलाईन को–या ई– निविदा प्रपत्राची रक्कम : रुपये ३,५४०/– (१८ टक्के जीएसटीसह (ना परतावा योग्य))
- ऑनलाईन बयाणा रक्कम : ११,१५,८००/– रुपये.
- (कामाची अंदाजित रक्कम जीएसटी वगळून – रु.१११५.७६ लक्ष)

को-या निविदा प्रपत्राची रक्कम व बयाणा रक्कम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाचे ऑनलाईन " पेमेंट गेटवे "व्दारेच स्वीकृत केली जाईल.

को-या ई – निविदा व नकाशे यांची नक्कल (Downloading) करणे / विक्रीकरण https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर दिनांक १७/०८/२०२६ रोजी १७.०० वा. पासून उपलब्ध होतील.

संपर्कासाठी दूरध्वनी क्र. (help desk no.) ०१२०-४००१००२/००५, ०१२०- ४४९३३९५

**दिपाली स्व. भाईक**
**मुख्य अभियंता**



सकाळ कनेक्ट | SIILC Transforming Human Capital


## निर्जलीकरण (डिहायड्रेशन) व्यवसाय प्रशिक्षण

**पुणे, ता. १४ : निर्जलीकरण उद्योगातील वाढत्या संधी लक्षात घेऊन २२ व २३ ऑगस्ट रोजी डिहायड्रेशन व्यवसाय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश शेतकरी, कृषी उद्योजक आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रात व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांना निर्जलीकरण तंत्रज्ञानाचे सविस्तर मार्गदर्शन करणे हा आहे.** प्रशिक्षणामध्ये निर्जलीकरण म्हणजे काय, या तंत्रज्ञानाचे महत्त्व व उपयोग, तसेच हा व्यवसाय कसा उभारावा याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. निर्जलीकरणासाठी लागणारे प्रमुख घटक, विविध पद्धती, उत्पादन प्रक्रिया, मशिनरी, त्याचा फ्लो चार्ट, तसेच तयार होणाऱ्या उत्पादनांचे बाजारमूल्य याविषयी सविस्तर माहिती दिली जाईल. यासोबतच बाजारपेठेतील संधी, विपणन पद्धती, शासकीय योजना व अनुदान, प्रकल्प उभारण्यासाठी जागेची निवड, अंदाजे गुंतवणूक आणि प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान फळभाज्या, पालेभाज्या, कंद, आयुर्वेदिक वनस्पती, फळे तसेच दुग्धजन्य पदार्थ, मांस, मच्छी व चिकन यांचे निर्जलीकरण प्रात्यक्षिकही दाखवले जाणार आहे. ही कार्यशाळा कमी गुंतवणुकीत मूल्यवर्धित व्यवसाय सुरू करण्यासाठी इच्छुकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. **– संपर्क : ८४८४८११५४४**

## 'लीव्ह अॅण्ड लायसन्स' मास्टरक्लास

मालमत्ता भाड्याने देताना आजकाल बहुतांश नागरिक 'रेंट' किंवा 'लीज' कराराऐवजी 'लीव्ह अॅण्ड लायसन्स' पद्धतीला प्राधान्य देत आहेत. मालक आणि लायसन्सधारक या दोघांच्याही हिताचे संरक्षण, स्पष्ट अटी-शर्ती आणि कायदेशीर सुरक्षितता यामुळे ही पद्धत अधिक लोकप्रिय ठरत आहे. मात्र, योग्य करारनामा तयार करणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, स्टॅम्प ड्यूटी व नोंदणी शुल्काची अचूक गणना, शासकीय पोर्टलवर अर्ज व शुल्क भरणे, बायोमेट्रिक प्रक्रिया तसेच पोलिस इंटिमेशन यांसारख्या प्रक्रिया तांत्रिक ज्ञानाशिवाय अनेकदा गुंतागुंतीच्या ठरतात. **याच पार्श्वभूमीवर या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करणारा 'लीव्ह अॅण्ड लायसन्स' मास्टरक्लास ३० ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे.** या प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष डेमोसह करारनामा तयार करण्यापासून ते नोंदणी पूर्ण करून ग्राहकाला मंजूर प्रत सुपूर्द करण्यापर्यंतची संपूर्ण ऑनलाइन प्रक्रिया शिकवली जाणार आहे. याशिवाय ११ महिन्यांच्या कराराची नोंदणी का महत्त्वाची आहे, कोणती कागदपत्रे आवश्यक असतात, स्टॅम्प ड्यूटी व नोंदणी शुल्काची गणना कशी करावी, पोलिस इंटिमेशनचे कायदेशीर महत्त्व, सरकारमान्य नमुन्यांचा वापर, ऑनलाइन नोंदणीतील सामान्य चुका आणि त्या कशा टाळाव्यात, तसेच रिअल इस्टेट एजंट, दस्तलेखक, मालमत्ता मालक आणि व्यावसायिकांनी कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित व्यवहार कसे करावेत याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. **– संपर्क : ८४८४८२२८५५**

## शब्दशोध क्र. १९२ — प्र. के. कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | | ५ | ६ |
| ७ | | | | | ■ | ८ | |
| ९ | | | | १० | ११ | | |
| ■ | १२ | १३ | १४ | | | | १५ |
| १६ | | १७ | | १८ | | १९ | |
| | ■ | | | | ■ | | |
| २० | | | ■ | २१ | | | |
| | ■ | २२ | २३ | | ■ | ■ | |
| ■ | २४ | | | ■ | २५ | | |

**आडवे शब्द :** १) उणीव; कमतरता; वानवा ४) राजा हरिश्चंद्राची पत्नी ७) पाहुणचार; आदरातिथ्य ८) ख्रिश्चन धर्मप्रचारिका ९) एक प्रवासी वाहन १०) पाणी पिण्याची इच्छा; तृष्णा १२) रात्र; यामिनी १७) रतीब; उकाडा १९) गर; मगज; खोबरे २०) पाण्यात उगवणाऱ्या वनस्पतीचे बुळबुळीत तंतू २१) अतिशय नीच माणूस २२) प्रतिपदा; वर्षप्रतिपदा २४) विस्मरण; आठवण नसणे २५) वांगे भाजून केलेले एक कालवण

**उभे शब्द :** १) हातोटी; कौशल्य २) भरभर (झाडावर वगैरे चढणे) ३) अरबी देव ४) तोडगा म्हणून गळ्यात किंवा हातात बांधतात तो गंडा; तावीज ५) चिंतन; ध्यान ६) पळसाच्या पानांची संख्या ११) माळ; सर; पराजय १३) आजूबाजूला; परिसरात १४) पाणी; जल; जीवन १५) झणझणीत; सडेतोड; सणसणीत १६) ताशावरची झोड; खरडपट्टी १८) कमतरता; उणीव; कसर १९) एक पक्षी; गिधाड २३) भय; भीती

### शब्दशोध १९१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | नं | द | व | न | ■ | ■ | ता |
| सा | द | ■ | सा | ख | र | झो | प |
| व | न | श्री | ■ | ■ | म | का | ■ |
| री | ■ | ध | रा | त | ल | ■ | र |
| ■ | आ | र | मा | र | ■ | मा | मा |
| न | ग | ■ | ■ | स | मां | त | र |
| का | म | गा | र | ■ | ड | ■ | म |
| शा | न | ■ | वा | ता | व | र | ण |

# नऊ जणांना कीर्ती चक्र

» पान १ वरून... तिन्ही कीर्तीचक्रे पॅराशूट रेजिमेंटच्या विशेष दलातील जवानांना मिळाली आहेत. '२१ पॅरा (स्पेशल फोर्सेस)'चे लेफ्टनंट कर्नल मॅनिओ फ्रान्सिस पीएफ आणि '२ पॅरा (स्पेशल फोर्सेस)'चे मेजर जितेंद्र राठी यांना कीर्तीचक्र प्रदान करण्यात आले आहे. लेफ्टनंट कर्नल फ्रान्सिस यांना यापूर्वी शौर्यचक्र मिळाले आहे. '२ पॅरा (स्पेशल फोर्सेस)'चे हवालदार गजेंद्र सिंह यांना कीर्तीचक्र मरणोत्तर प्रदान करण्यात आले आहे.

### कीर्ती चक्र
- लेफ्टनंट कर्नल मानिओ फ्रान्सिस
- मेजर जितेंद्र राठी
- हवालदार गजेंद्र सिंह (मरणोत्तर)
- हवालदार जगबीरसिंग (मरणोत्तर)
- जसवंतसिंह (मरणोत्तर)
- बलविंदरसिंह (मरणोत्तर)
- तारिक हुसेन (मरणोत्तर)
- बशीर अहमद (मरणोत्तर)
- सुनीलकुमार (मरणोत्तर)

### बार टू शौर्यचक्र
- मेजर आदित्य प्रतापसिंह

### बार टू सेना पदक (शौर्य)
- मेजर अनुज महाजन

### सेना पदक (शौर्य)
- लेफ्टनंट कर्नल पुष्कर विजय चौधरी
- मेजर रवीशंकर जोशी
- कॅप्टन स्वराज सुधीर बने
- कॅप्टन पृथ्वीराज निघोट
- सुभेदार नामदेव कणसे
- हवालदार अबिदअली अश्रफअली

### नौसेना पदक
- सी. अविनाश अण्णासो


**पंजाब नैशनल बैंक** भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

**एआरएमबी, नाशिक**
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

**सेक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**

**स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**
**(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)**

**सेक्युरिआयझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

| लॉट क्र. | शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे | अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ------ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक | अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम | लिलावाचे दिनांक व वेळ | कर्जदारांच्या बोझाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००)** **कर्जदार - मे. गणराज कृषी केंद्र दिग्रस कऱ्हाळे** पत्ता - मालमत्ता नं. १५४८, मेन रोड, दिग्रस (के.) ता. हिंगोली, जि. हिंगोली-४३१७०५ **प्रोप्रायटर** **श्री. माधव किसन कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ **जामीनदार / तारणदार - श्री. साहेबराव किसनराव कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ | १. मालमत्ता नं. १५४८, सर्व्हे नं. १२११, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. क्षेत्रफळ एरिया ३५० स्क्वे.मी. (अंदाजे) **मालकी हक्क - श्री. माधव किसन कऱ्हाळे** **चतुःर्सिमा - पुर्व** - सरस्वती गिरीची जमीन , **पश्चिम** - सावली रोड, **दक्षिण** - शिवचरण गिरी यांची जमीन, **उत्तर** - रामचंद्र सोनाजी काळे यांची जमीन **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78227198** २. मालमत्ता नं. ५७६, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. **क्षेत्रफळ एरिया १११.४८ स्क्वे.मी. मालकी हक्क - साहेबराव किसनराव कऱ्हाळे** **चतुःर्सिमा - पुर्व** - श्री. शिवाजी प्रभुजी कऱ्हाळे यांची मालमत्ता,**पश्चिम** - रस्ता, **उत्तर** - श्री. गणपती सुरुशे यांची मालमत्ता, **दक्षिण** - श्री. रमेश कऱ्हाळे यांची गल्ली मालमत्ता **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78234317** | अ) १८.०५.२०२४ पेपर प्रसिध्दी दिनांक १३.०७.२०२४ ब) रु.३२,७२,३७०.२४ + इतर व्याज श्री क) २५.०९.२०२४ ड) सांकेतिक ताबा | १. अ) रु. २१.४८ लाख ब) रु. २.१४८ लाख (०२.०९.२०२६) क) रु. ०.१० लाख; १. अ) रु. ११.६४ लाख ब) रु. १.१६४ लाख (०२.०९.२०२६) क) रु. ०.१० लाख | दि. ०२.०९.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |
| २ | **शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००)** **कर्जदार - श्री. मुरलीधर पुरुषोत्तम अग्रवाल** पत्ता - घर नं. १२-१०८, सिटीएस नं. २४९० आणि २४९१, कालीमाता मंदिर जवळ, गादीपुरा, ता.जि. हिंगोली- ४३१५१३ **जामीनदार - १.श्री. विजयलाल मनोहरलाल जैस्वाल** पत्ता - नंदापुर, कळमनुरी, हिंगोली, ता.जि. हिंगोली- ४३१ ७०२ | घर नं. १२-१०८, सिटी सर्व्हे नं. २४९० आणि २४९१, कालीमाता मंदिर जवळ, गादीपुरा, हिंगोली. **एकुण क्षेत्र - १०४.६० स्क्वे.मी., मालकी हक्क श्री मुरलीधर पुरुषोत्तम अग्रवाल** **चतुःर्सिमा - उत्तर** - सरकारी रस्ता, **दक्षिण** - सरकारी गल्ली **पुर्व** - बल्लाना बी. कांडी यांचे घर **पश्चिम** - सरकारी रस्ता **प्रोपर्टी आयडी - PUNBQ6A10356836** | अ) ०६.०१.२०२४ ब) रु. २७.९७ लाख अधिक व्याज आणि खर्च क) १५.०७.२०२४ ड) सांकेतिक ताबा | अ) रु. २४.४९ लाख ब) रु. २.४४९ लाख (०२.०९.२०२६) क) रु. १.०० लाख | दि. ०२.०९.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 02.09.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर https://baanknet.com वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया www.pnb.bank.in. आणि https://baanknet.com ही वेबसाईट पाहावी

दिनांक - १५.०८.२०२६ | स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. सजील कुमार
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)